सन २०१९-२० व २०२०-२१ करिता भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अंतर्गत मंजुर "गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्रात समुह कुक्कुटपालन संमिलित विपणन कार्यक्रम राबविणे " योजनेच्या मार्गदर्शक तत्वांना मंजूरी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः केंद्रीय-२०१९/प्र.क्र. ९७/का-१९
मंत्रालय, मुंबई ४०००३२
तारीख: १८/०९/२०१९

संदर्भ-

१. जनजाती कार्यमंत्रालयाचे पत्र दि.११०१५/०४(१४)/२०१८-TSP,दि.२१.०६.२०१८

२. आदिवासी विकास विभाग,शासन निर्णय क्र.केंद्रिय-२०१८/प्र.क्र.६९/का.१९,दि.१०.०९.२०१८

३.जनजाती कार्य मंत्रालय,नवी दिल्ली यांचे पत्र क्र.F.No.११०१५/०१/२०१९-Grants,दि.११/०३/२०१९.

४.आदिवासी विकास विभाग,शासन निर्णय क्र.केंद्रीय-२०१९/प्र.क्र.६३/ का.१९, दिनांक २९/०६/२०१९ व दि.२३/०७/२०१९

प्रस्तावना-

केंद्र शासनाकडून दरवर्षी विशेष केंद्रीय सहाय्य अंतर्गत अनुदान, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अंतर्गत व अदिम जमाती विकास कार्यक्रम या योजनाअंतर्गत राज्य शासनास अनुदान प्रदान होत असते. या योजनाअंतर्गत प्राप्त होणा-या अनुदानासाठी नावीन्यपूर्ण प्रस्ताव सादर करण्याबाबत प्रकल्प अधिकारी ए.आ.वि.प्रकल्प कार्यालय, शासकीय, अशासकीय/ सामाजिक /खाजगी संस्था यांना आदिवासी विकास विभागाकडून आवाहन करण्यात आलेले होते. यानुषंगाने प्राप्त झालेल्या प्रस्तावांची सविस्तर छानणी करून निवडक प्रस्ताव मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील कार्यकारी समितीकडे सादर करण्यात आले. सदर प्रस्तावामध्ये जिल्हाधिकारी,गडचिरोली यांनी सादर केलेला महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) व National Smallholder Poultry Development Trust,भोपाळ यांच्यामार्फत संयुक्तपणे गडचिरोली जिल्ह्यातील १००० आदिवासी महिलांसाठी कुकुटपालनाच्या माध्यमातून उपजीविकेचा शाश्वत स्रोत तयार करून उत्पन्नात वाढ करणेसाठी रू.१६७७.५४ लक्ष निधीच्या प्रस्तावाचा समावेश आहे .

२. जनजाती कार्य मंत्रालयाने दिनांक १२.०२.२०१९ रोजी आयोजित केलेल्या Project Appraisal Committee (PAC) बैठकीमध्ये सन २०१९-२० व २०२०-२१ करिता भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अंतर्गत "गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्रात समुह कुक्कुटपालन संमिलित विपणन कार्यक्रम राबविणे" ही योजना राबविण्यासाठी अनुक्रमे रू.५०० लक्ष व रू.१००० लक्ष असे एकूण १५००.०० लक्ष इतक्या रकमेच्या प्रस्तावास संदर्भाधिन पत्र क्र.३ अन्वये मंजुरी दिलेली आहे व सन २०१९-२० करिता वितरित केलेला रू.५०० लक्ष

निधी संदर्भाधीन शासन निर्णय क्र.४ अन्वये आयुक्त, आदिवासी विकास,नाशिक यांना वितरित करण्यात आला आहे.

३. तसेच केंद्र शासनाकडून सन २०१८-१९ मध्ये विशेष केंद्रिय सहाय्य अंतर्गत Special Projects on Health & Nutrition by state through back yard poultry and convergence of schemes योजनेसाठी रू.२०१.५० लक्ष निधी मंजुर झालेला आहे. सदर निधी संदर्भाधीन शासन निर्णय क्र.२ अन्वये आयुक्त, आदिवासी विकास,नाशिक यांना वितरित करण्यात आला आहे.

४. स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेचे रूपांतर राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानात करण्यात आले. महाराष्ट्र राज्यात सदर अभियान हे महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) या नावाने राबविले जाते. ‘उमेद अर्थात महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची राज्यात १५ जिल्ह्यांत आणि १३४ तालुक्यांत इन्टेन्सिव्ह पद्धतीने तर उर्वरित तालुक्यात सेमी व नॉन इन्टेन्सिव्ह पद्धतीने अंमलबजावणी होत आहे. सेमी आणि नॉन इन्टेंसिव्ह तालुक्यांचे रूपांतर टप्प्या टप्प्याने इन्टेन्सिव्ह तालुक्यात केले जात आहे. इन्टेंसिव्ह पद्धतीने राबविण्यात येणाऱ्या जिल्ह्यात आणि तालुक्यात जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष आणि तालुका अभियान व्यवस्थापन कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. हे अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी राज्यस्तरापासून ग्रामस्तरापर्यंत स्वतंत्र मनुष्यबळाची व अंमलबजावणी यंत्रणेची निर्मिती करण्यात आली आहे.

५. NSPDT (National Small Holder Poultry Development Trust), भोपाळ ही संस्था सन २००९ साली स्थापन झाली असून कुक्कुटपालन बाबत कामकाज करते. ही संस्था मध्यप्रदेश, झारखंड ,आसाम,ओडिसा व महाराष्ट्र या राज्यांमध्ये जवळपास १३,००० महिलांसोबत कामकाज करते . NSPDT मुख्यत्वे लघु कुक्कुटपालन व्यवसायाबाबत कामकाज करते व महिलांना या व्यवसायात जोडण्याचे काम करते.

६. सबब, जिल्हाधिकारी,गडचिरोली यांनी सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने गडचिरोली जिल्ह्यातील १००० आदिवासी महिलांसाठी नामवंत व या क्षेत्रामध्ये कामाचा अनुभव असलेली NSPDT (National Small Holder Poultry Development Trust) संस्था व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) मार्फत भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अंतर्गत मंजूर “गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्रात समुह कुक्कुटपालन संमिलित विपणन कार्यक्रम राबविणे योजना राबविण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचनांना मंजूरी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

शासन निर्णय-

गडचिरोली जिल्ह्यातील १००० आदिवासी महिलांसाठी कुकुटपालनाच्या माध्यमातून उपजीविकेचा शाश्वत स्रोत तयार करून उत्पन्नात वाढ करणे या उद्देशाने “गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्रात समुह कुक्कुटपालन संमिलित विपणन कार्यक्रम राबविणे ” ही योजना NSPDT संस्था, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) व आदिवासी विकास विभाग यांच्यामार्फत संयुक्तपणे राबविण्यासाठी एकुण

रु.१६७७.५४ लक्ष किंमतीच्या अंमलबजावणी मार्गदर्शक सूचनांना या निर्णयाद्वारे सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्रमांक १ नुसार मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार वितरीत तरतूदींच्या मर्यादेत योजना राबविण्याबाबत त्वरीत कार्यवाही आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी करावी व त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र आर्थिक व भौतिक अहवालासह शासनास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१८१४३०५६४२२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh Shivaji Jadhav

Digitally signed by Santosh Shivaji Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1f635bf4a671627c02b82e6a01acb4a38afc24f58a5534a9d1271fe258a564b0, serialNumber=b8ee819ccc335cea98640b72c63671dd013899d3601f09ce4ea340e1741652a0, cn=Santosh Shivaji Jadhav
Date: 2019.09.20 16:59:57 +05'30'

(संतोष जाधव)
कार्यासन अधिकारी

प्रत,

१) मा.मंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय,मुंबई
२) मा.राज्यमंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३) प्रधान सचिव,आदिवासी विकास, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई
४) आयुक्त,आदिवासी विकास,नाशिक.
५) सहसचिव,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
६) जिल्हाधिकारी,गडचिरोली.
७) अपर आयुक्त, आदिवासी विकास नागपुर
८) मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,गडचिरोली
९) उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली, भामरागड व अहेरी
११) जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक,MSRLM,गडचिरोली
१२) संचालक, NSPDT संस्था, भोपाळ
१३) संगणक समन्वयक,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
१४) निवड नस्ती (का.१९) आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई

भारतीय संविधान अनुच्छेद २७५(१) अंतर्गत मंजूर योजना सन २०१९-२० ते २०२०-२१

परिशिष्ट-१

<table>
<tr><td>१</td><td>योजनेचे नांव</td><td>गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्रात समुह कुक्कुटपालन संमिलित विपणन कार्यक्रम राबविणे</td></tr>
<tr><td>२</td><td>योजनेतील लाभार्थी संख्या</td><td>गडचिरोली जिल्ह्यातील २९ गावांतील १००० आदिवासी कुटुंबे</td></tr>
<tr><td>३</td><td>योजनेचे प्रस्तावित क्षेत्र</td><td>
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>गावाचे नाव</th><th>अ.क्र</th><th>गावाचे नाव</th><th>अ.क्र.</th><th>गावाचे नाव</th></tr>
<tr><td>१</td><td>अरेंडा</td><td>११</td><td>क्रिश्तापूर (वेल)</td><td>२१</td><td>कानेपल्ली</td></tr>
<tr><td>२</td><td>कसमपल्ली</td><td>१२</td><td>मैलाराम</td><td>२२</td><td>खमणचेरू</td></tr>
<tr><td>३</td><td>कोरेली (बुद्रुक)</td><td>१३</td><td>रामय्यापेठा</td><td>२३</td><td>रामपुर टोला</td></tr>
<tr><td>४</td><td>कोरेली (खुर्द)</td><td>१४</td><td>तंबोडी</td><td>२४</td><td>दिनाचेरपल्ली</td></tr>
<tr><td>५</td><td>मेडपल्ली</td><td>१५</td><td>वेलगुर टोला</td><td>२५</td><td>महागाव खुर्द</td></tr>
<tr><td>६</td><td>तेलवाडा</td><td>१६</td><td>नवेगाव</td><td>२६</td><td>राजपूर</td></tr>
<tr><td>७</td><td>आलदंडी</td><td>१७</td><td>बेलगुर</td><td>२७</td><td>रामपूर चाक</td></tr>
<tr><td>८</td><td>चानदरा (स)</td><td>१८</td><td>येलचील</td><td>२८</td><td>मुतापुर</td></tr>
<tr><td>९</td><td>पेरमिली</td><td>१९</td><td>बोरी</td><td>२९</td><td>सुभासनगर</td></tr>
<tr><td>१०</td><td>बोटालाचेरू</td><td>२०</td><td>इटालचेरू</td><td>३०</td><td></td></tr>
</table>
उपरोक्त गावांच्या यादीमध्ये व लाभार्थी संख्येमध्ये आवश्यकतेनुसार वाढ करण्याचे अधिकार नियंत्रक अधिकार यांना असतील.</td></tr>
<tr><td>४</td><td>वित्तीय तरतूद</td><td>
<table>
<tr><th>क्र.</th><th>वर्ष</th><th>योजना</th><th>निधी (रू.लक्ष)</th></tr>
<tr><td>1</td><td>2018-19 (SCA)</td><td>Special Projects on Health & Nutrition by state through back yard poultry and convergence of schemes</td><td>201.50</td></tr>
<tr><td>2</td><td>2019-20</td><td>National Small Holder Poultry Development Trust-Establishing Business Systems for Growth of Small-holder Broiler farming in Gadchiroli</td><td>500.00</td></tr>
<tr><td>3</td><td>2020-21</td><td>National Small Holder Poultry Development Trust-Establishing Business Systems for Growth of Small-holder Broiler farming in Gadchiroli</td><td>1000.00</td></tr>
<tr><td colspan="3">एकूण</td><td>1701.50</td></tr>
</table>
उपरोक्त मंजुर निधीमधून योजनेसाठी आवश्यक निधी रू.१६७७.५४ लक्ष निधी उपलब्ध करून देण्यात येईल.</td></tr>
<tr><td>५</td><td>योजनेचे खर्चाचे अंदाजपत्रक</td><td>सदर योजनेसाठी सन २०१९-२० ते २०२२-२३ पर्यंत एकूण रू.१६७७.५४ लक्ष खर्च अपेक्षित आहे. चार वर्षांचे सविस्तर खर्चाचे अंदाजपत्रक परिशिष्ट-२ मध्ये सोबत जोडले आहे.

जिल्हाधिकारी,गडचिरोली यांना योजनेसंबंधी मंजुर तरतुदीच्या मर्यादेत प्रकल्पाच्या खर्चाच्या तपशीलामध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकार असतील.</td></tr>
</table>

६	**योजना राबवणारी यंत्रणा**	महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) व The National Smallholder Poultry Development Trust Bhopal (NSPDT)
७	**नियंत्रक अधिकारी**	जिल्हाधिकारी,गडचिरोली व जिल्हास्तरीय सुकाणू समिती
८	**योजनेचा कालावधी**	शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून ४ वर्षे
९	**योजनेचा उद्देश**	आदिवासी भागातील मागास व अत्यल्प उत्पन्न गटातील आदिवासी महीलांना कुक्कुटपालनाच्या माध्यमातुन अतिरिक्त रोजगाराचे साधन उपलब्ध करुन देणे व त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढीस मदत करुन त्यांना स्वावलंबी बनविणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या योजनेच्या माध्यमातुन खालील उद्देश साध्य करता येतील. १. उमेद अभियान अंतर्गत गटातील आदिवासी कुटुंबांना उत्पन्न वाढीचे स्त्रोत निर्माण करणे. २. गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी महिलांसाठी कुक्कुटपालनाच्या माध्यमातून उपजीविकेचा शाश्वत स्त्रोत तयार करून देऊन एकूण उत्पन्नात वाढ करणे. ३. उत्पादक कंपनीच्या सामूहिक व्यवसायाच्या व्यवहार्यतेची स्थापना करणे आणि त्यांना आत्मनिर्भर करणे. ४. गटाच्या समुहातुन सहभाग़ी तत्वावर उत्पादक कंपनीची स्थापना, त्यांचे बळकटीकरण करणे व इनपुट सप्लाय चेन मजबूत करणे. ५. एकदिवसीय कुक्कुटपक्षी संगोपण व तदनंतर विक्री करणे ६. विक्रीच्या प्राप्त नफ़्यातुन लाभार्त्यांना लाभांश वाटप. ७. कंपनीच्या जंगम व खेळत्या भांडवालात वाढ करणे.
१०	**योजना अंमलबजावणीची कार्यपध्दती**	१. योजनेच्या अनुषंगाने गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी/ आदिम कुटुंबातील १००० महिलांची निवड केली जाईल. २. योजनेच्या अनुषंगाने निवड केलेल्या प्रत्येक गावामधून महिला लाभार्थ्यांची निवड करून लाभार्थ्यांचा गट (CIG) अंमलबजावणी यंत्रणा तयार करेल ३. जिल्हाधिकारी,गडचिरोली हे अंमलबजावणी यंत्रणेसोबत विचारविनिमय करून योजनेचे अंमलबजावणी वेळापत्रक अंतिम करतील. **लाभार्थी निवड –** १) लाभार्थी अनुसुचित जमातीची महिला असावी. २) सदर महिला महाराष्ट्र राज्य जीवनोन्त्ती अभियान (MSRLM) च्या महीला गटाची सदस्या असावी. ३) सदर महीला स्वत: किंवा ज्या कुटुंबाची सदस्या आहे ते कुटूंब भुमीहीन, अत्यल्प/ अल्प भुधारक (२ हेक्टर पर्यंतचे भुधारक) असल्यास त्यांना प्राधान्य देण्यात येईल. ४) NSPDT आणि MSRLM एकत्रीतपणे लाभार्थी निवड करतील.लाभार्थी निवडीमध्ये संबंधित प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प हे यंत्रणांना आवश्यक ते सहकार्य करतील.

		५) आदिम जमातीतील महिलांना व विधवा महिलांना प्राधान्य देण्यात यावे. ६) लाभार्थी महिला कुटुंबाकडे पोल्ट्री शेड उभारण्यासाठी स्वत:च्या मालकीची पर्याप्त जमीन व पाण्याची व्यवस्थी असावी. ७) लाभार्थी निवड करताना योजनेची द्विरूक्ती होणार नाही याची खातरजमा करण्यात यावी. **प्रशिक्षण –** १) निवड केलेल्या महीला लाभार्थ्यांचे प्रशिक्षण व गरजेनुसार वेळोवेळी मार्गदर्शन करण्याची जबाबदारी NSPDT भोपाळ यांची राहील. २) जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक , महाराष्ट्र राज्य जीवनोन्नती अभियान (MSRLM) गडचिरोली यांनी निवड झालेल्या लाभार्थ्यांचे गटनिहाय प्रशिक्षण हे समुह स्तरावर (Cluster level) NSPDT भोपाळ यांच्या सहकार्याने आयोजित करावे. **लाभार्थ्यांसाठी शेड बांधकाम व व्यवस्थापन –** १) लाभार्थी यांनी कुक्कुटपालन व्युवसाय करण्याकरीता आवश्यक असलेले पक्षीगृह (शेड) स्वतःच्या जागेत करावयाचे असुन यासाठी ५०० वर्गफ़ुट पर्यंत अतिरिक्त जागा लाभार्थीकडे असावी. निवड केलेली ही जागा स्वतःच्या अथवा कुटुंबातील व्यक्तीच्या नावे असावी. लाभार्थ्यांच्या स्वतःचे नावे जमीन नसल्यास लाभार्थ्याने जागा भाड्याने घेउन त्या जागेचा ३० वर्षाचा लेखी करारनामा नोंदणीकृत केलेला असणे आवश्यक आहे. २) योजनेच्या अनुषंगाने प्रत्येक लाभार्थी कुटुंबांसाठी अमलबजावणी यंत्रणेमार्फत ५०० चौरस फुट पौल्ट्री शेडचे बांधकाम केले जाईल. तसेच कुक्कुट पालनासाठी आवश्यक असलेले इतर साहित्य देण्यात येईल. ३) लाभार्थीकडुन पक्षीगृह बांधकाम करायचे असल्याने पुरेशा पाण्याची व्यवस्था करावी लागेल. सदर शेड ची साफ़साफ़ाई करणे व रोग पसरु नये याची जबाबदारी लाभार्थ्यांची राहील. ४) लाभार्थ्यांच्या समान उद्देश गटाला (Common Interest Group) पक्षीगृह बांधकामासाठी निधी कार्यान्वयिन यंत्रणेने टप्प्यानुसार सर्व बाबींची पुर्तता केल्यानंतर थेट लाभ हस्तांतरण (DBT) पद्धतीने लाभार्थ्याच्या खात्यामध्ये जमा करावा. ५) तसेच प्रत्येक लाभार्थ्यांना सुरूवातीस अमलबजावणी यंत्रणेमार्फत खेळते भांडवल (working Capital)दिले जाईल. या मध्ये कुक्कुट पालनासाठी पक्षी, खाद्य व लसीकरण इत्यादी बाबींचा समावेश असेल. ६) योजनेच्या अनुषंगाने अमलबजावणी यंत्रणेमार्फत निवड केलेल्या प्रत्येक महिला लाभार्थीची क्षमता बांधणी केली जाईल त्यासाठी त्यांना प्रशिक्षण तसेच NSPDT च्या सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या प्रकल्पांना क्षेत्रीय भेटी आयोजित केल्या जातील. ७) योजनेच्या अनुषंगाने लाभार्थी महिलांची उत्पादक कंपनी स्थापन केली जाईल. योजनेच्या अनुषंगाने NSPDT संस्था लाभार्थी महिलांची व उत्पादक गटांची क्षमता बांधणी करतील.

<table>
<tr><td></td><td></td><td>८) योजनेच्या अनुषंगाने उत्पादक कंपनीमध्ये सद्यस्थितीत असलेल्या लाभार्थी व्यतिरिक्त इतर लाभार्थ्यांना जोडण्याबाबत उत्पादक कंपनी तसेच NSPDT संस्था ही जिल्हास्तरीय सुकाणु समितीच्या मान्यतेने निर्णय घेतील.</td></tr>
<tr><td>८</td><td>निधी वितरण कार्यपद्धती</td><td>➢ शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर सदर योजनेचा निधी हा आयुक्त,आदिवासी विकास नाशिक, यांच्यामार्फत जिल्हाधिकारी,गडचिरोली यांना वितरित करण्यात येईल.
➢ जिल्हाधिकारी,गडचिरोली यांना योजनेसाठी मंजुर तरतुदीच्या मर्यादेत प्रकल्पाच्या खर्चाच्या बाबींमध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकार असतील.
➢ योजनेच्या प्रगतीनुसार अंमलबजावणी यंत्रणेला निधी वितरित करावयाचे टप्पे बाबत जिल्हा सुकाणू समिती प्रथम बैठकीत निर्णय घेईल
➢ अंमलबजावणी यंत्रणेला निधी वितरित करावयाचे टप्पे बाबतची माहिती व यामध्ये वेळोवेळी होणारे बदलांबाबत जिल्हास्तरीय सुकाणू समिती ही आयुक्त,आदिवासी विकास,नाशिक यांना अवगत करेल.
➢ योजनेच्या अनुषंगाने झालेल्या खर्चाचा अहवाल वेळोवेळी आयुक्त आदिवासी विकास यांना सादर करण्याची जबाबदारी योजना राबवणाऱ्या यंत्रणेची राहील.</td></tr>
<tr><td>९</td><td>सनियंत्रन व मूल्यमापनासाठी जिल्हास्तरीय सुकाणू समिती</td><td>जिल्हास्तरीय सुकाणु समिती या संपुर्ण प्रकल्पाच्या कामाचे संनियंत्रण करेल तसेच कामाचे मुल्यमापन करण्याची जबाबदारी देखील या समितीची राहील .तसेच त्रयस्थ यंत्रणेमार्फत कामाचे मुल्यमापन करण्याचा अधिकार समितीस राहील.
योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मूल्यमापन व संनियंत्रणासाठी खालीलप्रमाणे जिल्हास्तरीय सुकाणू समिती स्थापन करण्यात येत आहे.
<table>
<tr><th>अ.क्र</th><th>पदनाम</th><th>पद</th></tr>
<tr><td>१</td><td>जिल्हाधिकारी,गडचिरोली</td><td>अध्यक्ष</td></tr>
<tr><td>२</td><td>मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद, गडचिरोली</td><td>सह-अध्यक्ष</td></tr>
<tr><td>३</td><td>प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प भामरागड /गडचिरोली/अहेरी</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>४</td><td>अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद, गडचिरोली</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>५</td><td>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, गडचिरोली</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>६</td><td>संबंधित सहायक प्रकल्प अधिकारी (विकास) ,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>७</td><td>NSPDT संस्था - जिल्हा व तालुका प्रतिनिधी</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>८</td><td>जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक,MSRLM,गडचिरोली</td><td>सदस्य-सचिव</td></tr>
</table></td></tr>
</table>

		➢ सदर योजनेच्या अंमलबजावणी प्रक्रीयेमध्ये काही बदल किंवा सुधारणा करण्याचे अधिकार उपरोक्त समितीस राहतील. ➢ योजनेची अंमलबजावणी सुरू झाल्यापासून उपरोक्त समितीची बैठक दर ३ महिन्यांनी आयोजित करावी व सदर बैठकीमध्ये योजनेच्या प्रगतीचा आढावा घेण्यात यावा तसेच योजना अंमबलजावणीमध्ये काही अडचणी असतील तर त्याचे निराकरणासाठी आवश्यक निर्णय घेण्याचा अधिकार या समितीस राहील. ➢ अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेने या समितीच्या बैठकीमध्ये केलेल्या कामाचा पूर्तता अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर अंमलबजाणी संस्थेस पुढील निधी वितरीत करण्यात यईल. NSPDT ने खालील प्रकारचे अहवाल समितीस सादर करावेत- ➢ प्रकल्पाच्या सुरुवातीला वार्षिक नियोजन ➢ मासिक प्रगती अहवाल ➢ त्रैमासिक प्रगति अहवाल ➢ वार्षिक अहवाल. ➢ त्रैमासिक निधी उपयोगीता अहवाल ➢ स्थापन झालेल्या कंपनीचा जमाखर्च ताळेबंद
१०	**यंत्रणा निहाय जबाबदारी**	**जिल्हास्तरीय यंत्रणा** - १. समुह कुक्कुटपालन संमिलित विपनन योजना जिल्हा गडचिरोली या प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी व संनियंत्रणासाठी जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या संयुक्त जिल्हास्तरीय सुकाणु समितीच्या नियंत्रणाखाली राबविली जाईल . या कार्यक्रमाखाली विविध उपक्रमांना प्रशासकीय मंजुरी देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी, गडचिरोली यांना राहतील. २. समुह कुक्कुटपालन संमिलित विपनन योजना , जिल्हा गडचिरोली या प्रकल्पास शासनाची मान्यता असल्याने विविध उपक्रमांसाठी स्वतंत्र तांत्रिक मान्यता घेण्याची आवश्यकता असल्यास जिल्हाधिकारी , गडचिरोली यांनी अशी तांत्रिक मान्यता देण्याची कार्यवाही करावी. याप्रकल्पांतर्गत मंजुर निधी आयुक्त,आदिवासी विकास,नाशिक यांच्यामार्फत जिल्हाधिकारी गडचिरोली यांना वितरीत करण्यात येईल. ३. जिल्हाधिकारी , गडचिरोली हे सदर निधी योजनेच्या विविध कामांच्या मंजुरी व प्रगतीनुसार NSPDT व इतर यंत्रणांना वितरीत करतील. **जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक , महाराष्ट्र राज्य जीवनोन्नती अभियान (MSRLM) गडचिरोली** - १. जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य जिवनोन्नती अभियान (MSRLM) गडचिरोली हे या प्रकल्पाचे कार्यान्वयीन व पर्यवेक्षीय तज्ञ यंत्रणा म्हणुन काम पाहतील.

२. जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य जिवनोन्नती अभियान (MSRLM) गडचिरोली यांनी या संबंधित समुहातील लाभार्थ्यांचे प्रबोधन करावे व त्यांच्याकडुन अर्ज मागवण्यात यावे.

३. जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य जीवनोन्नती अभियान (MSRLM) गडचिरोली यांनी लाभार्थ्याने योजनेचा लाभ मिळवण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना व त्यासोबत जोडायची इतर आवश्यक कागदपत्रे यांचा तपशील निश्चित करुन विहीत नमुन्यात लाभार्थ्याचे अर्ज स्वीकारण्यात यावे. सदर अर्ज स्वीकारण्याची मुदत ३० दिवस देण्यात यावी. अर्ज स्वीकारल्यानंतर प्राथमिक छाननी करून अंतिम मान्यतेसाठी जिल्हाधिकारी,गडचिरोली यांच्या अध्यक्षतेखालील समितीसमोर सादर करावेत.

४. जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य जिवनोन्नती अभियान (MSRLM) गडचिरोली यांनी अर्ज स्वीकारल्यापासुन ४५ दिवसाच्या आत लाभार्थी निवड पुर्ण करावी.तसेच सदर याद्या संबंधित प्रकल्प अधिकारी यांना उपलब्ध करून देण्यात याव्यात. निवड झालेल्या लाभार्थ्यांना त्याबाबत लेखी स्वरुपात देखील कळाविण्यात यावे.

The National Smallholder Poultry Development Trust Bhopal (NSPDT) –

१. एन.एस.पी.डी.टी. भोपाळ यांनी लाभार्थ्यांच्या उत्पादक कंपनीची (SPV) स्थापना करावी व या कंपनीच्या एकंदरीत सर्व कामकाजावर देखरेख करणे, समन्वय साधणे , सल्ला देणे व इतर बाबींसाठी कंपनीच्या व्यवस्थापनाची उभारणी करावी . कंपनीत तयार झालेले उत्पादन म्हणजे कुक्कुट पक्षी यांच्या विक्रीकरीता स्थानिक पातळीवर बाजारपेठ व विक्री व्यवस्थेचे आयोजन करावे. यासाठी आवश्यक ती सर्व मदत समन्वय व जिल्हाधिकारी गडचिरोली यांच्या अध्यक्षते खालील सुकाणु समितीमार्फ़त करण्यात येईल.

२. एन. एस.पी.डी.टी. भोपाळ यांनी निवड केलेल्या लाभार्थ्यांमधून आवश्यक तेवढ्या प्रवर्तकांची निवड करुन उत्पादक कंपनी स्थापन करण्याची कायदेशीर कार्यवाही ६० दिवसात करण्यात यावी.

३. एन. एस.पी.डी.टी. भोपाळ यांच्याकडे पक्षीगृह बांधकाम (Poultry shed) मंजुर टाईप प्लान प्रमाणे करणे, बांधकामाचा दर्जा व त्यानुषंगाने कराव्या लागणा-या इतर सर्व कामांची जबाबदारी राहील. कार्यक्रमांतर्गत केल्या जाणा-या बांधकामाचा दर्जा इतर बाबीचा तपासणी संबंधित पंचायत समितीमधील कार्यरत कनिष्ठ अभियंता हे करतील . त्यांनी केलेला तपासणी अहवाल ते जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य जीवनोन्नती अभियान (MSRLM) गडचिरोली व जिल्हास्तरीय समिती यांना सादर करतील.

४. पक्षीगृह बांधकामाच्या अनुषंगाने करावयाच्या तपासणीसाठी आवश्यकतेनुसार कंत्राटी/मानधन तत्वावर अभियंत्यांची नेमणुक करण्याची मुभा समितीला असेल.

५. एन. एस.पी.डी.टी. भोपाळ च्या प्रकल्प व्यवस्थापकाची लेखी संमती असल्याशिवाय समान

		उद्देश गटाला (common interest group) या योजनेसाठीचा निधी काढता येणार नाही.तसेच सदर वितरीत करावयाचा निधी दोन टप्प्यात म्हणजे प्रथम टप्पा झाल्यावर ६० टक्के व दुसरा टप्पा झाल्यावर ४० टक्के याप्रमाणात देण्यात येईल. यासाठी एन. एस.पी.डी.टी. भोपाळचे प्रकल्प व्यवस्थापक (Project Director) यांनी प्रमाणित करुन त्याबाबतचे उपयोगीता प्रमाणपत्र संबधित यंत्रणेस सादर करावे. ६. एन. एस.पी.डी.टी. भोपाळ यांचेकडे कार्यक्रम कार्यक्रम वाटप केलेल्या कुक्कुट पक्षांना (Poultry birds) रानीखेत, देवी प्रतिबंधित लसीकरणाच्या सुविधा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी राहील. तसेच एकदिवसीय पिल्लांच्या ब्रुडिंग संदर्भात व क्कुक्कुटपालन संदर्भात लाभार्थ्यांना माहिती देण्यात यावी. ७. निवड केलेल्या महीला लाभार्थ्यांचे प्रशिक्षण व गरजेनुसार वेळोवेळी मार्गदर्शन करण्याची जबाबदाड़ी एन. एस.पी.डी.टी. भोपाळ यांची राहील. ८. एन. एस.पी.डी.टी. भोपाळ संस्थेच्या सहाय्याने स्थापित केले जाणारे लाभार्थींची उत्पादक कंपनी तर्फे या कार्यक्रमाखाली लाभ दिलेल्या लाभार्थ्यांच्या बाबतीत दिलेल्या गटापासुन मिळणा-या उत्पादनाचे अभिलेख व्यवस्थित ठेवावेत. पक्षांचे अंड्यावर येणे, वय, त्यांच्यापासुन मिळणारे एकुण व सरासरी उत्पन्न इत्यादी बाबतच्या नोंदी ठेवाव्यात व या पथदर्शी प्रकल्पाची फलश्रुती संकलित करून अहवाल जिल्हास्तरीय सुकाणू समितीस सादर करावा.
११	**योजनेच्या अटी व शर्ती**	१) सदर योजनेच्या अमलबजावणीच्या अनुषंगाने उपलब्ध मंजूर निधीतच योजना पूर्ण करण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची राहील. योजनेसाठी मंजूर निधीच्या व्यतिरिक्त या योजनेच्या अनुषंगाने पक्षी प्रजनन केंद्र (Breeding Farm) व अंडी उबवणी केंद्र (Hatchery) यांच्यासाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता असल्यास त्याबाबतचा प्रस्ताव स्वतंत्रपणे शासनास सादर करावा. २) योजना विहित वेळेत पूर्ण करण्याची जबाबदारी अंमलबजावणी करणाऱ्या संस्थेची असेल. ३) योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने आऊट सोर्सिंग करण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची राहिल. ४) योजनेच्या अनुषंगाने अंमलबजावणी यंत्रणांसोबत जिल्हाधिकारी,गडचिरोली यांनी सामंजस्य करार करावा. ५) प्रकल्पामध्ये होणाऱ्या बदलाची पूर्वकल्पना जिल्हा सुकाणू समितीला देऊन समितीच्या मान्यतेनेच बदल करावा. ६) प्रकल्प राबवितांना आवश्यक असणारे प्रशिक्षण/कार्यशाळा/कार्यक्रम संस्थेद्वारे घेणे बंधनकारक असेल. ७) योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने अंमलबजावणी यंत्रणेला १००० महिला लाभार्थ्यांची निवड करणे , त्यांना पोल्ट्री फार्म उभारून देण्यात येईल. ८) योजनेच्या अनुषंगाने निवड केलेल्या लाभर्थ्यांची यादी सबंधित प्रकल्प अधिकारी व जिल्हा सुकाणू समिती यांना सादर करण्यात यावी.

		९) योजनेच्या अनुषंगाने लाभार्थीची उत्पादक कंपनी स्थापन करणे व लाभार्थ्यांमार्फत सुरळीतपणे चालविणे अंमल बजावणी यंत्रणेला बंधनकारक राहील. १०) अंमलबजावणी करणाऱ्या संस्थेला केलेल्या कामाचा पूर्तता अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र विहीत नमुन्यात शासनास सादर करणे बंधनकारक असेल. ११) सदर योजनेची अंमलबजावणी करताना चलचित्र (video) व छायाचित्रे काढावीत व योजनेची अंमलबजावणी पुर्ण झाल्यानंतर योजनेचा फलनिष्पत्ती अहवाल शासनास सादर करण्याची जबाबदारी प्रकल्प अधिकारी व अंमल बजावणी यंत्रणा यांची राहील तसेच लाभार्थ्यांची यादी व Geo-tagged photographs हे www.stcmis.gov.in/smis या वेबसाईट वर अपलोड करण्याची जबाबदारी प्रकल्प अधिकारी यांची राहील. १२) योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने योजनेच्या प्रगती बाबत माहिती वेळोवेळी CAS पोर्टल वर भरण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची असेल
१२	**योजनेची फलनिष्पती**	१. १००० आदिवासी महिला कुक्कुटपालन व्यवसाय करून आत्मनिर्भर होतील. २. पोल्ट्री उत्पादकांसाठी उत्पादक कंपनी स्थापन होऊन त्यांची इनपुट सप्लाय चेन मजबूत होईल ३. १००० कुटुंबांना शाश्वत उत्पनाचा स्रोत उपलब्ध होईल. ४. गावातच उत्पन्नाचा स्रोत उपलब्ध झाल्यामुळे स्थलांतर रोखण्यास मदत होईल. ५. महिला कंपनीच्या माध्यमातुन व महिलांच्या आर्थिक विकासाद्वारे महिला सक्षमीकरण साधण्यास मदत होईल.

परिशिष्ट-२

योजनेच्या खर्चाचे अंदाजपत्रक

अ.क्र.	बाबनिहाय	लाभार्थी	वर्ष पहिले	वर्ष दुसरे	वर्ष तिसरे	वर्ष चौथे	एकूण	टक्केवारी
अ	**उत्पादक पातळीवर**							
१	प्रक्षेत्र उभारणे (Poultry shed)	उत्पादक	२,४०,००,०००	३,६०,००,०००	३६०,००,०००	२,४०,००,०००	१२,००,००,०००	७१.५%
२	प्रशिक्षण, क्षमता बांधणी व प्रात्यक्षित	NSPDT	५,८०,०००	८,७०,०००	८,७०,०००	५,८०,०००	२९,००,०००	१.७%
ब	**सार्वजनिक पातळीवर**							
१	सामूहिक स्वरुपाचा खर्च	PC*	५९,००,०००	६०,००,०००	६०,००,०००	४०,००,०००	२,१९,००,०००	१३.१%
२	प्रकल्प कार्यालय स्थापना खर्च	NSPDT**	६,००,०००	-	-	-	६,००,०००	०.४%
	योजना कार्यान्वित करण्यासाठी होणारा खर्च							
१	यंत्रणा राबविणाऱ्या चमूचा खर्च (मनुष्यबळ)	NSPDT	२८,१५,२००	३०,९६,७२०	३४,०६,३९२	-	९३,१८,३१२	५.६%
२	उत्पादकांना एकत्रित महसुली साहाय्य	NSPDT	३०,७४,४००	३३,८१,८४०	३७,२०,०२४	-	१,०१,७६,२६४	६.१%
३	मुख्य कार्यालय	NSPDT	८,६४,०००	९,५०,४००	१०,४५,४४०	-	२८,५९,८४०	१.७%
	एकूण		**३,७८,३३,६००**	**५,०२,९८,९६०**	**५,१०,४१,८५६**	**२,८५,८०,०००**	**१६,७७,५४,४१६**	**१००%**
	*Producers Company **National Smallholder Poultry Development Trust							